# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Director(I/c.)
Ph. No. - 07132-223104

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 822 /2019 Dt: 11/02/2019

प्रति,

मा. प्राचार्य/रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**विषय: समर्थ युवा समृध्द भारत या संकल्पनेवरील राज्यस्तरीय विशेष शिबीरमध्ये रासेयो स्वंयसेवक पाठविण्याबाबत.**

**संदर्भ: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व श्री लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ, यांचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अंर्तगत **श्री लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ. ता. कुही, जिल्हा— नागपूर** यांना दि. १९/०२/२०१९ ते २५/०२/२०१९ या सात दिवसाच्या कालावधीत **लेमदेव पाटील महाविद्यालय परिसर मांढळ** येथे राज्यस्तरीय विशेष शिबीर आयोजनाची मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर शिबीरामध्ये गोंडवाना विद्यापीठातील ०५ स्वयंसेवक ०५ स्वयंसेविका व ०१ कार्यक्रम अधिकारी सहभागी होणार असून आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवकांची नावे **रासेयो गडचिरोली जिल्हा समन्वयक डॉ. नरेंद्र आरेकर (संपर्क ७५८८७७२९६० narenarekar@gmail.com) व रासेयो चंद्रपूर जिल्हा समन्वयक डॉ. विजया गेडाम (संपर्क ९७६६४३५१२३ vijayagedam.kamble@gmail.com)** तसेच मा. संचालक रासेयो विभाग गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे अनुमती पत्रासह दिनांक १४/०२/२०१९ पर्यंत पाठवावे.

धन्यवाद!

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र.)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# राष्ट्रीय सेवा योजना
# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
## व
## श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय मांढळ, द्वारे आयोजीत
### ''समर्थ युवा, समृध्द भारत'' या संकल्पनेवर आधारित, राज्यस्तरिय शिबिर

**स्थळः–. श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय परिसर, मांढळ ता. कुही जि. नागपूर**

**दि. १९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०१९**

प्रति,

श्री. / डॉ. / प्रा. / प्राचार्य ________________

________________________________

________________________________

**विषयः– ''समर्थ युवा, समृध्द भारत'' या संकल्पनेवरील राज्यस्तरिय राष्ट्रीय सेवा योजना शिबिर दि. १९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०१९**

महोदय,

संत्रा नगरी, कॅपिटल ऑफ टायगर व द्वितीय कमांकाचे हिरवे शहर म्हणून प्रसिध्द असलेल्या नागपूर जिल्हातिल कुही तालुक्यातील मांढळ येथे आंभोरा परीसरातील मराठीचे आद्यकवी विवेकसिंधु रचित मुकुंदराजाच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या व राष्ट्रीयस्तरावरील अडम येथील आंतरराष्ट्रीय नांव झालेल्या उत्खनाचे ठिकाणी तसेच आंतरराष्ट्रीय खातीप्राप्त उमरेड क–हांडला व्याघ्र प्रकल्पाच्या शेजारी **''समर्थ युवा, समृध्द भारत''** या संकल्पनेवर आधारित राज्यस्तरिय शिबिराचे आयोजन होत आहे. या शिबिरात महाराष्ट्रातील ३२५ विद्यार्थी व २६ विद्यापीठे सहभागी होत आहेत.

आपणास विनंती आहे की, आपल्या विद्यापीठ / महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकातील ०५ स्वयंसेविका व ०५ स्वयंसेवक तसेच ०१ कार्यक्रम अधिकारी, शिबिरात सहभागी होण्यासाठी पाठवावे. शिबिराचा तपशील, सूचना व नियम पत्रासोबत जोडलेले आहेत, ते विद्यार्थी, विद्यार्थिनी व कार्यक्रम अधिकारी यांच्या निदर्शनास आणून निवड करावी. निवड झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात From of Indemnity सह पाठवावी From of Indemnity शिवाय आलेल्या विद्यार्थ्यांना शिबिरात प्रवेश मिळणार नाही ही बाब निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी शिस्तीचे व वेळेचे पालन करणे आवश्यक आहे. शिस्तीचा भंग करणा–या स्वयंसेवकाना शिबिरातून त्वरीत घालवून दिले जाईल व त्यांची सूचना संबधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना व

राष्ट्रीय सेवा योजनेच्या संचलकांना देण्यात येईल म्हणून आपणास आवर्जून विनंती करण्यात येत आहे की महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाची नियुक्ती काळजीपूर्वक करावी.

आपण त्वरीत अनुमतीदर्शक पत्र व शिबिरार्थ्यांची नावे दि. १०.०२.२०१९ पर्यंत पोहोचतील अशा बेताने प्राचार्य, श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ ता. कुही जि. नागपूर यांचेकडे पाठवावे म्हणजे शिबिरार्थ्यांची सोय करण्याच्या दृष्टीने बरे होईल आपण आमच्या विनंतीचा सहहृदयतेने विचार कराल हीच अपेक्षा. धन्यवाद!

आपले विनीत


डॉ. अविनाश तितरमारे
शिबिर प्रमुख तथा जिल्हा
समन्वयक नागपूर ग्रामिण,
Email.
(avinashltitarmare@gmail.com)

प्रा. पी. बी.कटमुसरे
प्राचार्य
श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय,

डॉ. केशव वाळके
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर

डॉ. महेश गायधने
सहकार्यक्रम अधिकारी रा.से.यो.
Email.ID:
(maheshgaidhane83@gmail.com)

डॉ. स्मिता खरकाळे
सहकार्यक्रम अधिकारी रा.से.यो.
Email.ID:
(smitakharkale2013@gmail.com)

श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ ता. कुही जि. नागपूर
Email.. lemdeopatilmahavidyalaya@hotmail.com


प्रतिलिपी सादर: 1 माननिय कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

# राष्ट्रीय सेवा योजना
# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
व
# श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय मांढळ द्वारे आयोजित
**''समर्थ युवा, समृध्द भारत'' या संकल्पनेवर आधारित, राज्यस्तरिय शिबिर**

---

**स्थळ :— श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय परिसर, मांढळ ता. कुही जि. नागपूर**
**दिनांक १९ फेब्रुवारी २०१९ ते २५ फेब्रुवारी २०१९**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन रासेयो कक्ष, मुंबई यांच्या निर्देशानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ यांच्या संयुक्त विद्यमाने **''समर्थ युवा, समृध्द भारत''** या संकल्पनेवर आधारित राज्यस्तरिय शिबिराचे आयोजन केले आहे. यात महाराष्ट्र राज्याच्या प्रक्षेत्रातील २६ विद्यापीठाचा समावेश असून एकूण ३२५ स्वयंसेवक सहभागी होत आहेत. श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय हे रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या कक्षेतील एक प्रमुख ग्रामीण महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाचा परिसर ऐतिहासिक तर आहेच, सोबतच नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे. हा परिसर मराठीचे आद्यकवी मुकुंदराजाच्या वास्तव्याने पुनित झालेला असून पांच नदयांनी वेढलेला व वैनगंगा, कन्हान व आम या नदयांच्या त्रिवेणी संगमावर आंभोरा वसलेला आहे. येथेच त्यांनी आपला मराठीतील आद्यग्रंथ विवेकसिंधू सिध्द केला आहे. आंभोरा हे महाराष्ट्रातील प्रसिध्द तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळ मांढळच्या शेजारी आहे. या परिसरातच येणा—या अडम येथे प्राचीन वाकाटक कालीन असिकनगरचा शोध लागला. मांढळच्या परिसरात राष्ट्रीय पुरातत्व विभागाने केलेल्या उत्खननात वाकाटक, प्रवरसेन, पृथ्वीसेनकालीन तांम्रपत्र व अनेक इतिहासकालीन अवशेष सापडले आहेत. असिकनगर ते आष्ट्रीया, फान्स या देशासोबत आंतरराष्ट्रीय व्यवहार झाल्याचे पुरावे मिळाले आहेत.

मांढळ हे नगर नागपूर जिल्हातील महत्वाचे केंद्र आहे या नगरीला पूर्वीपासूनच नाटय कला, कुस्ती, काव्य यांची आवड असल्याने आजही सातत्याने काव्य, नाटके, वाङःमयीन उपकम होत असतात. येथील ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने महाविद्यालयाची उभारणी झाली असून महाविद्यालयाजवळ भव्य अशा प्रकारचे विर्स्तीण पटांगण आहे. आल्हाददायक वातावरणात सुसज्ज इमारत असून महाविद्यालयाच्या स्थापनेपासून म्हणजे १९९० पासून शैक्षणिक कार्यासोबत कीडा, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक अशा प्रकारचे उपकम विद्यार्थ्यांसाठी सातत्याने राबविण्यात येत असतात. त्यामुळे अल्पावधितच या महाविद्यालयाने अनेक क्षेत्रात वैशिष्टयपूर्ण असे यश प्राप्त केले आहे. शिस्तप्रिय विद्यार्थी हे महाविद्यालयाचे प्रमुख अंग आहे.

रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत १९९३ साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेत आमच्या महाविद्यालयाने आतापर्यंत केलेले कार्य स्पृहणीय आहे.
आर्ट ऑफ लिव्हींग, राज्यस्तरिय व्यक्तिमत्व विकास शिबिर, वनसचेतन शिबिर, स्वच्छतादूत कार्यशाळा आदिंचे यशस्वी आयोजन व अश्वमेध कीडा स्पर्धा, आंतरविद्यापीठ पश्चिम विभागीय युवामहोत्सव यातील सकीय व उत्कृष्ट सहभागाबद्दल रासेयो विद्यापीठात अग्रस्थानावर आहे. आमच्या महाविद्यालयाच्या वतीने आयोजित

होणारी रा.से.यो ची शिबिरे या भागातील ग्रामीण परिसरात वैशिष्टपूर्ण ठरली असून आकर्षणाचा विषय झाली आहेत. विशेषतः महाशिवरात्री, वसंत पंचमीला श्री क्षेत्र आंभोरा देवस्थान येथे दरवर्षी भरणा–या यात्रेत चेंगराचेंगरी होऊ नये म्हणून आपत्ती व्यवस्थापन व स्वच्छता अभियानाद्वारे महत्व पूर्ण कार्य केले जाते ज्याची दखल सुध्दा शासकीय पातळीवर घेतली गेली आहे. येथे दरवर्षी शासनातर्फे रासेयोचा गौरव करण्यात येतो. आमच्या महाविद्यालयातील रा.से.योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अविनाश तितरमारे यांची या विभागाच्या अनेकानेक कार्यक्रमाच्या प्रमुखपदी रा.तु.म. नागपूर विद्यापीठाद्वारे नियुक्ती झाली आहे. सध्या ते नागपूर ग्रामीणचे जिल्हा समन्वयक आहेत. त्यांना अनेक प्रशस्तीपत्रे तसेच अनेक संस्थेकडून त्यांचा गौरवही करण्यात आला आहे. सन २००० मध्ये राजकोट येथे व २००८ मध्ये पुणे येथे पूर्वप्रजासत्ताक राष्ट्रीय पथसंचलन शिबिराचे नागपूर विद्यापीठाच्या वतीने, त्याचप्रमाणे २००४ मध्ये राज्यस्तरिय पुणे ते पंढरपूरच्या वारीसोबत २० दिवस विद्यापीठाच्या दहा विद्यार्थ्यांच्या चमूचे नेतृत्व केले. २००५ मध्ये पटना बिहार येथील युवा महोत्सवात राज्याचे नेतृत्व केले. तर २००६ हम्पी कर्टनाटक येथे आंतरराज्य शिबिरात राज्याचे नेतृत्व. २००७ मध्ये त्यांना रासेयोचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय तसेच सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून पुरस्कार देऊन विद्यापीठाने गौरव केला. दोनदा राज्यस्तरिय पुरस्कारासाठी विद्यापीठाच्या वतीने शासनाकडे नामांकनही झाले.

राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे आमच्या महाविद्यालयात अनेक सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक जाणिवांची निर्मिती करणारे उपक्रम चालू असतात. परिणामी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरिय शिबिरांकरिता विद्यापीठाच्या वतीने निवड होवून त्यांत विद्यार्थ्यांनी अनेक पुरस्कार प्राप्त करतांना विविध शिबिरातुन उत्कृष्ट शिबिरार्थी म्हणूनही नावलौकिक प्राप्त केलेला आहे. शिवाय राज्यस्तरिय प्रजासत्ताक पथसंचलन शिबिर मुंबई व पूर्वप्रजासत्ताक राष्ट्रीय पथसंचलन शिबिरात दरवर्षी विद्यार्थ्यांची निवड होत असते. मनोज लेंडे याची केंद्रसरकारच्या वतीने विद्यापीठातर्फे दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्य होणा–या पथसंचलनाकरिता निवड झाली व त्यानंतर शासनाने उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून पुरस्कार देऊन गौरव केला. इंदिरा गांधी राष्ट्रीय पुरस्कारासाठीही त्याचे नामाकंन झाले. आतापर्यंत ७ रासेयोची पुरस्कार महाविद्यालयाला प्राप्त झाले आहेत. संचालक मंडळाचे व्यवस्थापन तसेच परिश्रम आणि महाविद्यालयाने केलेल्या सर्वांगिण प्रगतीचे फलित म्हणून सशक्त देशासाठी समार्थ्यवान व कर्तृत्वान युकांची एक फळी निर्माण व्हावी व त्याच्यांतील उपजत कलागुणांना वाव मिळावा म्हणुन विद्यापीठ व शासनाने 'समर्थ युवा, समृध्द भारत' या संकल्पनेवर आधारित राज्यस्तरिय शिबिर आयोजीत करण्याची संधी महाविद्यालयाला प्राप्त करुन दिली. करिता या राज्यस्तरिय शिबिरात विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन उपक्रम यशस्वी करण्यास सहकार्य करावे ही विनंती.

# Nagpur the orange City and Tiger Capital of India
## (संत्रानगरी व वाघांची राजधानी नागपूर)

नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी तसेच राज्यातील तिसरे मोठे शहर व विदर्भातील सर्वात मोठे शहर म्हणून प्रसिध्द आहे. देशाच्या केंद्रस्थानी असलेल्या या शहरात शासनाचे एक हिवाळी अधिवेशन दरवर्षी होत असते भारताचे 'शून्य मैल दगड' (Zero milestone) इथेच असून नागपूरच्या भौगोलिक स्थानामुळे देशातंर्गत भारतातील सर्व अंतराचे मोजमाप इथूनच केले जाते.

मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जन्मस्थान व मुख्यालय आदीसह 'आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यावरणावरील संशोधन संस्था (NEERI), कापूस संशोधन संस्था (ICR) इत्यादी संस्थाही नागपूरातच आहेत. जगातील सर्वात मोठा असलेला पोकळ स्तूप आंतरराष्ट्रीय प्रसिध्द दीक्षाभूमी, स्वामीनारायण मंदिर, भारतीय रिजर्व बँक, जागतिक निर्यात होत असलेली संत्री म्हणून संत्रा नगरी, नागपूर जिल्हात व आसपास असलेले चार व्याघ्र प्रकल्प पेंच, बोर, कोका, नागझीरा, नवेगांवबांध, उमरेड क–हांडला व चंद्रपूर येथील ताडोबा इत्यादी ठिकाणच्या व्याघ्र पर्यटनामुळे नागपूरची टायगर कॅपीटल ऑफ इंडिया अशी नवी ओळख झाली असून, शिवाय भारतातील द्वितीय कमांचे हिरवे शहर (Green city) इत्यादीमुळे शहराचे नांव अधोरेखित झाल्यामुळे जागतिक नकाशावर हे शहर आले आहे.

**अवतीभवतीचे नागपूरः–**

नागपूर पासून १५ ते ११० किलो मीटर अंतरावरील पर्यटन केंद्रात अग्रस्थानावर असलेले कामठी येथील बौध्द विहार हे जागतिक दर्जा प्राप्त झालेले विपश्यना केंद्र, प्रसिध्द 'ड्रॅगन पॅलेस', पुढे रामटेक येथील अत्यंत पुरातन असलेले राममंदीर गडकिल्ला, पर्यटन स्थळ खिंडसी, नार्गाजुन, रामधाम, जैन मंदिर,'मेघदूतकार' कवी कालीदास स्मारक व जवळच पेंच धरण व पेंच व्याघ्र प्रकल्प तिथुन पुढे पूर्वेकडील मार्गावर कोका, नवेगावंबांध नागझिरा, कचारगढ येथील 'पारी कोपार लिंगो' हया आदीवासीच्या गोंडीयन संस्कृतीच्या रचनाकाराने आशिया खंडातील, सर्वात मोठी महाकाय प्राचीन गुंफा तयार केली आहे. जवळच सालेकसा येथील सुप्रसिध्द धबधबा 'हाजरा फॉल' व शासकीय अतिथी निवास बोदलकसा आहे. दक्षिणेकडील मार्गावर जामठा येथील आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट मैदान, पुढे बोरधरण व बोर व्याघ्र प्रकल्प, पुढे चंद्रपूर येथील ताडोबा अंधेरी व्याघ्र प्रकल्प, जवळच सुप्रसिध्द बाबा आमटचे 'आनंदवन' वरोरा येथील 'कुष्टरोगी आश्रम' आदी ठिकाणी पर्यटनाचा आनंद घेता येतो.

## शिबिराचा तपशिल, सूचना व नियम

१. शिबिराचा कालावधी :– दि. १९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०१९ पर्यंत

२. शिबिरात उपस्थित होण्याची वेळ आणि दिवस:– सर्व शिबिरार्थ्यांना दि. १९/०२/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिबिर स्थळी उपस्थित राहावे. बैद्यनाथ चौक नागपूर बस स्थानक येथून सकाळी ६.३० वाजेपासून नागपूर कुही मांढळ ते पचखेडी आंभोरा मार्गावर बसची व्यवस्था आहे. तसेच सक्करदरा चौक नागपूर येथून दर १५ मि. खाजगी वाहणे उदा. ट्रॅक्स, जीप्स कुही मांढळच्या नावाने सुटतात. नागपूर पासून शिबिर स्थळ ४५ कि. मी. अंतरावर आहे.

३. निवास व भोजन व्यवस्था :– सर्व शिबिरार्थ्याची भोजन व निवासी व्यवस्था आयोजकांतर्फे करण्यात येईल.

४. ओळखपत्र :– शिबिरार्थ्यांनी आपली ओळखपत्रे हे महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अधिकृतपणे दिलेले पत्रा सोबत आणावे. प्राचार्याच्या /कार्यक्रम अधिका–याच्या अधिकृत पत्राशिवाय शिबिरार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

५. प्रवास खर्च :– शिबिरार्थ्याचा प्रवास खर्च, महाविद्यालयांनी त्यांच्याकडे असलेल्या नियमित रा.से.यो अनुदानातुन करावा.

### ६. शिबिराची दिनचर्या :–

| | | |
|---|---|---|
| | पहाटे ५.०० वाजता | "जागर" |
| | सकाळी ५.५५ ते ७.०० | प्रार्थना, चितंन, व्यायाम |
| सत्र १ ले | सकाळी ७.३० ते ११.०० | श्रमसंस्कार, श्रमदान |
| सत्र 2 रे | दुपारी २.३० ते ४.३० | बौध्दिक /व्याख्यान |
| | सायं ४.४५ ते ६.०० | क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम |
| | सायं ६.०० ते ६.३० | अहवाल वाचन, मनोगते, प्रार्थना |
| | रात्री ८.०० ते १०.०० | सांस्कृतिक कार्यक्रम |
| | रात्री १०.०० | विश्रांती |

७. **शिबिरातील विशेष प्रकल्पः**–**१.** श्रमसंस्कार **२.** व्यसनमुक्ती मार्गदर्शन **३.** सर्वासाठी आरोग्य **४.** राष्ट्रीय एकात्मता व सर्वधर्मसमभाव **५.** पर्यावरण **६.** वृक्षसंवर्धनाचे महत्व **७.** प्रदूषण **८.** स्वयंरोजगार व ग्रामोद्योग **९.** एड्स प्रतिबंधात्मक मार्गदर्शन **१०.** युवकापुढील आव्हाने, समर्थ युवक व भारत, युवा नेतृत्व व व्यक्तिमत्व विकास **११.** पानलोटक्षेत्र व्यवस्थापन **१२.** माहिती व तंत्रज्ञान **१३.** प्लास्टिक निर्मुलन **१४.** निसर्गभ्रमण व अरण्यवाचन **१५.** अंभोरा उपसासिंचन प्रकल्प दर्शन **१६.** सांस्कृतिक, सृजनात्मक कार्यक्रमातून समाजप्रबोधन.

या प्रकल्पावर आधारित परिसंवाद, वक्तृत्व, चर्चासत्र, गटचर्चा, प्रश्नमंजुषा, समयस्फुर्त भाषण व प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम या सर्वच उपक्रमामध्ये सहभागी व्हायचे असल्यामुळे शिबिरार्थ्यांनी पूर्ण तयारीने यावे.

८. सांस्कृतिक कार्यक्रमः– शिबिरात सादर करण्यात येणारे सांस्कृतिक कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांना साजेसे असावे. लोक प्रबोधन व जनजागृती ही उदिदष्टे असणा–या कार्यक्रमानाच प्राधान्य देण्यात येईल.

९. शिबिरार्थ्यांनी सोबत आणण्याचे साहित्यः–

१. शिबिरार्थ्यांना आपल्यासोबत कॅन्व्हास शुज/पी.टी. शुज, मोजे अवश्य आणावेत.

२. थंडीचे दिवस असल्यामुळे पूर्ण बिछाना आणावा. साधरणतः तापमान या वेळेस १५ ते २० अंश डीग्री सेल्सअिस दरम्यान असते.

३. साबण, मंजन,कंगवा, तेल इत्यादी आवश्यक साहित्य प्रत्यकाने आणावे.

४. कोणत्याही मौल्यवान वस्तु सोबत आणु नये.

५. औषधांची गरज असल्यास औषध सोबत आणावे.

६. शक्य असल्यास टॅक सुट/हाफ पॅट व पी.टी. शुज, मोजे अवश्य आणावेत.

१०. महाविद्यालयाचा ध्वज व बॅनर विद्यार्थ्यांनी आपल्यासोबत आणावा व आयोजकांच्या स्वाधीन करावा.

११. शिबिरार्थ्याची नावे पाठविण्याचा दिनांक व पत्ताः– अनुमतीदर्शक पत्र व विद्यार्थ्याचे नाव दि. १० फेब्रुवारी २०१९ पर्यंत पोहचतील अशा बेताने प्राचार्य श्री. पी.बी. कटमुसरे श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ यांचेकडे पाठवावेत ही विनंती.

## १२. शिबिरार्थ्यांची नियमावलीः–

१. शिबिरार्थी आपल्या पालकांच्या व महाविद्यालयाच्या संमतीने, शिबिरात सहभागी होत आहे असे गृहित धरुन शिबिरात एखादा अपघात वा दुखापत झाल्यास वा अन्य कारणांनी शिबिरार्थ्यांना वा पालकांना नुकसान भरपाई मागता येणार नाही.

२. शिबिरात एकदा दाखल झाल्यानंतर शिबिर सोडून कोणालाही आपल्या मर्जीप्रमाणे गावाला वा अन्य ठिकाणी जाता येणार नाही.

३. शिबिराच्या संपूर्ण कालावधीत शिस्त पाळावी व शांतता राखावी

४. रासेयोचे शिबिर सहजीवन शिबिर असून आपल्यापासून सोबत राहणा–या कोणालाही त्रास होणार नाही यांची काळजी घ्यावी परस्पराबददल अनुचित व असभ्य शब्दांचा वापर करु नये.

५. बेशिस्त नजरेत आल्यास त्यांना शिक्षा करण्यात येईल व तसे संबधित विद्यापीठाला व संबधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात येईल.

६. नेमून दिलेले काम व प्रकल्प जबाबदारीपूर्वक करावे लागतील

७. शिबिरप्रमुख, कार्यक्रम अधिकारी व संबधित प्राध्यपकांनी ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे वागावे लागेल.

८. प्रत्येक शिबिरार्थ्याला प्रत्येक कार्यक्रमात सहभागी व्हावे लागेल.

९. कुणालाही धुम्रपान, तंबाखु, गुटखा, सेवन करता येणार नाही.

१०. प्रकल्पाचा अहवाल ठरवून दिलेल्या वेळेतच दयावा लागेल.

११. शिबिर कालावधीत घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

१३. शिबिराचा तपशिलः–

दि. १९/०२/२०१९ सायंकाळी ५.०० वाजे पर्यत नोंदणी

दि. २०/०२/२०१९ दुपारी २.०० वाजता उदघाटन

दि. २४/०२/२०१९ दुपारी २.०० वाजता समारोप

दि. २५/०२/२०१९ सकाळी ९.०० वाजता प्रस्थान

१४ नकाशाः– बस व खाजगी वाहन मार्ग




**उमरेड /नागपूर – मांढळ बस मार्गाचा नकाशा**

उमरेड, रेल्वे ब्राम्हणी, उदासा ते कुही बस व खाजगी वाहन मार्ग २२ कि.मी.

उमरेड, तारणा, पारडी, वग ते मांढळ बस व खाजगी वाहन मार्ग २३ कि.मी.

नागपूर (रेल्वे/बस स्थानक ) ते मांढळ :– ५० कि.मी.

ईतवारी नागपूर (रेल्वे स्थानक ) ते कुही (रेल्वे स्थानक ) :– ३० कि.मी.

उमरेड (रेल्वे स्थानक ) ते कुही (रेल्वे स्थानक ) :– २३ कि.मी.

कुही (रेल्वे स्थानक ) ते शिबिर स्थळ (मांढळ):– १० कि.मी.

**बस व्यवस्था** : नागपूर ते मांढळ, पचखेडी, फेगड, कुही मांढळ, आंभोरा, सिर्सी (नवेगांव), तुडका नागपूर कुजबा, वग, गोठनगावं क–हांडला.मांढळ येणा–या या मार्गावर धावत असतात.

: साकोली भंडारा, मौदा ते माथनी, अडम, वडेगावं, मांढळ या मार्गावरुन सकाळ ते सांयकाळ पर्यंत पाच वेळांमध्ये या मार्गावर धावत असतात.

आपण त्वरित अनुमतीदर्शक पत्र व विद्यार्थ्यांची नावे १० फेब्रुवारी २०१९ पर्यत पाठवावी ही विनंती.

**संपर्कः– शिबिरस्थळी पोहोचल्यांनतर खालील व्यक्तीशी संपर्क साधवा.**

| डॉ. अविनाश तितरमारे | डॉ. महेश गायधने | डॉ. स्मिता खरकाळे | डॉ. नवनितकुमार लांबा |
|---|---|---|---|
| शिबिर प्रमुख तथा कार्यक्रम अधिकारी व जिल्हा समन्वयक नागपूर ग्रामीण | सहकार्यक्रम अधिकारी तथा संयोजक रा.से.यो | सहकार्यकम अधिकारी तथा सहसंयोजक रा.से.यो. | शिबिर सहसंयोजक रा.से.यो |
| मो.नं. 8275396377, 9422122825 | मो.नं. 9822098833 | मो.नं. 9075925569 | मो.नं. 9763971617 |

# SHRI LEMDEO PATIL MAHAVIDYALAYA MANDHAL

## **STATE LEVEL CAMP-2019**

## NATIONAL SERVICE SCHEME

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of the student | : ................................................................ |
| 2 | Name of the College | : ................................................................ |
| 3 | Class | : ................................................................ |
| 4 | Blood Group | : ................................................................ |
| 5 | Date of Birth | : ................................................................ |
| 6 | Home Address of the student (with Telephone no.) | : ................................................................ |
| 7 | Experience in N.S.S. | : ................................................................ |
| 8 | Languages Known | : ................................................................ |
| | | a]Speaking................................................................ |
| | | b] Writing................................................................ |
| | | C] Reading................................................................ |
| 9 | Number of Camps. Attended | : ................................................................ |
| 10 | Hobby | : ................................................................ |
| 11 | Special Skill/Art | : ................................................................ |
| 12 | Any other Activities | : ................................................................ |
| 13 | Interesting Field | : ................................................................ |
| 14 | Remarks | : ................................................................ |

Signature of the Programme Officer. N.S.S.

Signature of the Principal and Seal

Signature of N.S.S. Volunteer

# INDEMNITY FORM

In, Consideration of my being nominated at my request to undergo all types of training and also participating in any camp course/Adventure training activities in/out side NSS and travelling I undertake and agree that neither I nor my executor administration will make any claim against the government of India or against any officer of NSS/Principal/Programme Officer/ Programme Co-Ordinators State Liaison Officer/Youth Officer/Assistant Programme Adviser/ Deputy Programme Adviser in respect of any loss or injury to the property of person (Including Injury Resulting in death ) which may be suffer while or in consequence of my being act in/out side NSS and travelling I understand that no compensation will be paid by the Government of India or any Officer as mentioned against any such loss or injury (including injury resulting in death) and I agree so as to bind myseif executors administrators to indemnity to the service of accident arising out of any act default on my art during in connection of said training camp/course/NSS,FD parade/adventure training camp and Journey by road/rail/sea/river and flight.

(Signature of the applicant)

HOME ADDRESS:

.........................................................

.........................................................

.........................................................

In the presence of witness No.

1] ..................................................

2] ..................................................

# NATIONAL SERVICE SCHEME

## Certificate of Medical/Physical Fitness

Signature of the Candidate ....................

I do hereby certify that I have examined Mr./ Ms............................................

S/o/D/o ..........................................................and found fit for undergoing rigorous training for Pre-Republic Day/Republic Day Camp/Adventure Camp/Youth Festival/ NSS Mega Camp.

The Candidate whose signatures are given above is not suffering any communicable or chronic disease, which may cause any hindrance in his/her participation in the above-mentioned rigorous training programme.

Station:

Dated :

Signature of the Medical Officer
with seal